शेतकऱ्यांनी पेरणीअगोदर उगवण क्षमता तपासून पेरण्या करावे : कृषिदूतांनी केले शेतकऱ्यांना आवाहन >>पान 2

दुर्घटना घडल्यानंतर तरी संजय राऊत यांनी राजकारण करू नये >>पान 3

लोकसहभागातून प्रभावी योग दिनाचे आयोजन करा - जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील >>पान 4

दैनिक
# आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com
मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

**सुविचार**
आपल्या आजुबाजूच्या लोकांना सन्मान द्या.



सोनाली बेंद्रेच्या गाण्याचं पन्हाळ्यावर शूटिंग, पाऊस-थंडीने कुडकुडली, तळपायाला ब्रँडी घासण्याची वेळ! आतील पान

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 276 ■ मंगळवार, दि. 17 जून 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

## मुंबई, पुणे, नागपूरसह महाराष्ट्रात पावसाचा कहर

### १० जणांचा मृत्यू

**मुबई/प्रतिनिधी : राज्यभरात पावसाचा जोर पुन्हा एकदा वाढू लागला आहे. परिणाम महाराष्ट्राच्या अनेक भागात मुसळधार पावसामुळे सुमारे १० जणांचा मृत्यू झाला आहे. बहुतेक मृत्यू वीज पडल्याने झाले आहेत. मुंबईसह महाराष्ट्राच्या बहुतेक भागात सतत पाऊस पडत आहे. अनेक ठिकाणी पूरसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. रेल्वे रुळांपासून ते घरांपर्यंत पाणी भरल्याचे पाहायला मिळत आहे.**



हवामान विभागाने रत्नागिरी आणि रायगडसारख्या किनारी जिल्ह्यांसाठी 'रेड अलर्ट' आणि पालघर, ठाणे, सिंधुदुर्ग आणि पुणे, सातारा आणि कोल्हापूरच्या घाटांसाठी 'ऑरेंज अलर्ट' जारी केला आहे. राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल (एनडीआरएफ) आणि राज्य आपत्ती प्रतिसाद दल (एसडीआरएफ) च्या तुकड्या मदत आणि बचाव कार्यासाठी तैनात करण्यात आल्या आहेत.

राज्य आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या अहवालानुसार, गेल्या २४ तासांत सकाळी ११ वाजेपर्यंत रत्नागिरीत सर्वाधिक ८८.१ मिमी पाऊस पडला. त्यानंतर रायगडमध्ये ६५.३ मिमी, सिंधुदुर्गमध्ये ४३.८ मिमी, ठाण्यात २९.६ मिमी आणि यवतमाळमध्ये २७.५ मिमी पाऊस पडला.

मुंबई, सिंधुदुर्ग, धुळे, नाशिक, संभाजीनगर, नंदुरबार आणि अमरावती येथे मृत्यू झाले. त्यापैकी बहुतेक मृत्यू वीज पडल्याने झाले. कोकणातील प्रमुख नद्यांपैकी रत्नागिरी जिल्ह्यातील जगबुडी नदी इशारा पातळीच्या वर वाहत आहे. आपत्ती व्यवस्थापन अहवालात म्हटले आहे की, जर पाण्याची पातळी आणखी वाढली तर नदीकाठच्या खेड, अलसुरे, चिंचघर आणि प्रभुवाडी गावांना त्याचा फटका बसू शकतो.

मुसळधार पावसामुळे मुंबईतील मध्य, पश्चिम आणि हार्बर रेल्वेच्या गाड्या ५ ते १० मिनिटे उशिराने धावत आहेत. रविवारी संध्याकाळपासून वसई-विरार परिसरात मुसळधार पाऊस पडत आहे. शहरातील अनेक सखल भागात पाणी साचले आहे. यामुळे वाहतूक आणि लोकांच्या दैनंदिन जीवनात अडचणी येत आहेत. राज्य सरकारच्या सूत्रांनी सांगितले की, सर्व विभागीय आयुक्त आणि जिल्हा दंडाधिकाऱ्यांना सतर्क राहण्यास आणि मदत आणि बचाव कार्य करण्यासाठी सज्ज राहण्यास सांगण्यात आले आहे.

समुद्रसपाटीपासून ७.६ किमी उंचीवर चक्राकार वाऱ्यांचा प्रदेश तयार झाला आहे. बंगालच्या उपसागरात समुद्रसपाटीपासून ३.१ ते ७.६ किमी उंचीवर चक्राकार वाऱ्यांचा प्रदेश देखील तयार झाला आहे. त्यामुळे आता मान्सून सक्रिय झाला आहे. मान्सून पुढे जाण्यासाठी अनुकूल हवामान असल्याने मान्सून विदर्भ, गुजरात, छत्तीसगड आणि ओडिशाकडे जाईल असा अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे. याचा अर्थ येत्या काही दिवसांत या राज्यांमध्येही चांगला पाऊस पडण्याची शक्यता आहे.

पुण्यातही सतत पाऊस

मुंबई आणि पुणे शहरांमध्ये रात्रीपासून सतत पाऊस पडत आहे. पुणे परिसरात रात्रीपासून मुसळधार पाऊस पडला आहे. वरंध घाट शिरगाव परिसरात ११३ मिमी पावसाची नोंद झाली आहे. तर मुठा घाटापासून लवासपर्यंत हलका पाऊस पडला आहे. मंगळवार आणि बुधवारी मुंबई आणि ठाण्यात पावसाची तीव्रता कमी होईल आणि मध्यम पाऊस पडेल असा हवामान खात्याचा अंदाज आहे. याचा अर्थ मुंबई आणि ठाण्यातील लोकांना काही प्रमाणात दिलासा मिळू शकतो.

### हेल्पलाइन क्रमांक जारी केला

बृहन्मुंबई महानगरपालिकेने (बीएमसी) एका पोस्टमध्ये म्हटले आहे की, 'भारतीय हवामान खात्याने मुंबई महानगर प्रदेशात (मुंबई शहर आणि उपनगरे) पुढील तीन तासांत मुसळधार पावसाचा इशारा दिला आहे. कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीत मदतीसाठी किंवा अधिकृत माहितीसाठी, बीएमसीच्या मुख्य नियंत्रण कक्षाच्या हेल्पलाइन क्रमांक १९१६ वर संपर्क साधा.' याचा अर्थ असा की मुंबईत काही अडचण आल्यास, बीएमसीच्या हेल्पलाइन १९१६ वर कॉल करा.

## १ किलो ६ तोळे वजनाचे सोन्याचे दागिने हस्तगत ग्रामीण पोलिसांची मोठी कामगिरी

**नाशिक/प्रतिनिधी :** मनमाड येथील डमरे कॉलनी परिसरातील व्यावसायिक मुर्तुजा अब्दुल हुसेन रस्सीवाला नामांकित व्यापारी हा आपल्या कुटुंबासोबत बाहेरगावी गेलेले असताना, अज्ञात चोरट्यांनी त्यांचे घरात घुसून घरातील १ किलो २०० ग्राम इतके सोन्याचे दागिने व आठ लाख रुपये रोकड मुद्देमाल चोरी केल्याची घटना ११ जून रोजी घडली. सदर घटनेबाबत मनमाड पोलीस ठाण्यात गुन्हा देखील नोंदवण्यात आला होता. त्या अनुषंगाने नाशिक ग्रामीण पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील यांनी तात्काळ घटनेच्या गांभीर्य बघत गुन्हे शाखेचे पथक व मनमाड पोलिसांना सदर गुन्हा उघडकीस आणण्यासाठी सूचना दिल्या होत्या. तात्काळ पोलिसांनी व गुन्हे शाखेच्या पथकांनी घटनास्थळावर भेट देऊन, श्वानपथक व तंत्रज्ञानाचा वापर करून पोलिसांनी आपले चक्र फिरवत अवघ्या पाच दिवसात मनमाड चांदवड परिसरातून तीन संशयित आरोपींना ताब्यात घेतले आहे.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय मुलांचे शासकीय वसतिगृह नांदुरा येथे प्रवेश प्रक्रिया सुरु

**बुलढाणा/प्रतिनिधी :** सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाअंतर्गत चालविण्यात येणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय मुलांचे शासकीय वसतिगृह, नांदुरा (जि. बुलढाणा) येथे शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ करिता प्रवेश प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

आरक्षित टक्केवारीनुसार अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, भटक्या व विमुक्त जमाती, इतर मागास प्रवर्ग, विशेष मागास प्रवर्ग, आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक, अपंग, अनाथ इत्यादी घटकांतील विद्यार्थ्यांना या प्रवेश प्रक्रियेस पात्रता आहे. नांदुरा नगरपरिषद हद्दीतील शाळा, विद्यालये व महाविद्यालयांमध्ये प्रथम वर्षात प्रवेश घेतलेले विद्यार्थी वसतिगृह प्रवेशासाठी अर्ज करू शकतात.

प्रवेश अर्ज फक्त ऑनलाईन पद्धतीने स्वीकारले जातील. इच्छुक विद्यार्थ्यांनी अर्ज भरताना https://hmas.mahait.org या अधिकृत वेबसाईटचा वापर करावा. विद्यार्थ्यांनी अर्ज भरण्याची प्रक्रिया पूर्ण करावी. तसेच अधिक माहितीसाठी संपर्क: ८९७५७७८९४९ मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा किंवा वसतिगृहाला प्रत्यक्ष भेट द्यावी, असे आवाहन गृहपाल एस. व्ही. सोनटक्के यांनी केले आहे.

## मंत्री संजय शिरसाट यांनी घेतली जरांगे यांची भेट



दैनिक आपला विदर्भ

**जालना/प्रतिनिधी :** मंत्री संजय सिरसाट यांनी मनोज जरांगे यांची भेट घेतली आहे. अंतर वाली सराटी येथे शिरसाट यांनी जरांगे यांची भेट घेतली. या दोन नेत्यांमध्ये मराठा विद्यार्थ्यांच्या जात प्रमाणपत्राच्या अडचणींबाबत चर्चा झाली. मनोज जरांगे यांनी या आधी संजय शिरसाट यांच्याकडे विद्यार्थ्यांच्या जात प्रमाणपत्र वैधतेसाठी अधिकारी अडथळे निर्माण करत असल्याची तक्रार केली होती. या अनुषंगाने ही भेट झाली. दरम्यान विद्यार्थ्यांना तात्काळ जात वैधता पडताळणी करून, जात प्रमाणपत्र देण्याचे आदेश अधिकाऱ्यांना देण्यात आल्याचं शिरसाट यांनी सांगितलं आहे. दरम्यान, जरांगे यांनी मंत्री महोदयांचा आदेश असताना सुद्धा जात प्रमाणपत्र वैधते दरम्यान राज्यातील काही अधिकारी विद्यार्थ्यांना जाणीवपूर्वक अडथळे आणत असल्याचा आरोप केला आहे.


## लिलावास आलेले कांदे भिजले, कांदा उत्पादक शेतकऱ्याचे नुकसान



**नाशिक/प्रतिनिधी :** राज्यात सर्वत्र पावसाचा जोर वाढताना दिसत असून यावेळी येवला कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये अनेक कांदा उत्पादक शेतकऱ्यांनी आपला कांदा लिलावासाठी आणला होता. मात्र अचानक आलेल्या पावसामुळे अक्षरशा हा कांदा भिजला गेल्याने शेतकऱ्याचे मोठे नुकसान झाले आहे. एक तर कांद्याला बाजार भाव नाही त्यातच पावसाने अशा प्रकारे कांद्याचे नुकसान होत असल्याने शेतकरी संकटात सापडला आहे.

## वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाने पपई बाग जमीनदोस्त

**जळगाव/प्रतिनिधी :** जळगाव जिल्ह्यातील पाचोरा तालुक्यातील खडकदेवळा बुद्रुक येथील प्रगतशील शेतकरी विश्राम पाटील यांच्या तीन एकर जमिनीत पपई या पिकाची लागवड केली होती. लाखो रुपये खर्च करून वाढवलेल्या पपई बाग काढणीवर आली होती. मात्र निसर्गाच्या लहरीपणाचा फटका सुमारे तीन एकर पपई बागाला बसून संपूर्ण पपई वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाने जमीनदोस्त झाली आहे. सदर शेतकऱ्याचे सुमारे पाच लाखांचे नुकसान झाले आहे. तरी शासनाने त्वरित पंचनामे करून नुकसान भरपाई द्यावी. अशी मागणी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनी केली आहे.



## इंद्रायणीसारखीच दुर्घटना घडण्याची भीती; वैनगंगा नदीवरील खचलेल्या पुलावरुन जीव मुठीत धरुन प्रवास

दैनिक आपला विदर्भ

**भंडारा/प्रतिनिधी :** पुणे जिल्ह्यातील कुंडमाळा येथे इंद्रायणी नदीवरील पूल कोसळून काल मोठी दुर्घटना घडली. त्यानंतर, सरकारला जाग आली असून आता राज्यातील पुलांचे ऑडिट करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. मात्र, अद्यापही राज्यातील अनेक जिल्ह्यात तशाचं दुर्दैवी घटनेची पुनरावृत्ती होऊ शकते. कारण, यंदा पाऊसमान भरपूर असून अनेक जिल्ह्यात नद्यांवरील पुल खचल्याचे किंवा धोकादायक स्थितीत असल्याचंही पाहायला मिळत आहे. भंडारा जिल्ह्यातही पुण्यासारख्याच दुर्दैवी घटनेची पुनरावृत्ती होऊ शकते, असे स्थानिकांचे म्हणणे आहे. प्रशासनाने वेळीचं लक्ष घातलं नाही आणि लोकांनीही सावधगिरी बाळगली नाही तर, इंद्रायणी नदीवरील घडलेल्या घटनेसारखी घटना घडू शकते. वर्षभरापूर्वी आलेल्या पुरात येथील कारधाच्या वैनगंगा नदीच्या पुलावरील लोखंडी कठळे वाहून गेलेत.

इंद्रायणी नदीवरील दुर्घटनेत पुलावर उभे असलेले अनेक पर्यटक नदीत कोसळून वाहून गेले आहेत. या दुर्घटनेमध्ये ४ जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला असून ५२ जणांना सुखरूप वाचवण्यात यश आले. त्यामध्ये ५१ जण जखमी झाले आहेत. मात्र, सावधगिरी न बाळगल्यास याच दुर्घटनेची पुनरावृत्ती होण्याची भीती व्यक्त होत आहे. भंडारा जिल्ह्यातील कारधा येथे ३० फूट खोल नदीवर असलेल्या या इंग्रजकालीन पुलाला आता ९५ वर्षांचा कालावधी झालाय. त्यामुळं हा पूल दोन वर्षांपासून प्रशासनाच्या कागदोपत्री बंद असला तरी, लोकांकडून त्यांच्या सोयीचा



आणि भंडारा शहराला जोडणारा जवळचा मार्ग म्हणून आजही त्याचा दिवसरात्र वापर करण्यात येत आहे. राष्ट्रीय महामार्गावरील भंडारा शहरालगत वैनगंगा नदीवर कोट्यवधींचा खर्च करून मोठ्या पुलाची निर्मिती करण्यात आलीय. मात्र, तिथून असणारी वर्दळ आणि अपघाताचं प्रमाण लक्षात घेता नागरिक त्या मार्गावरून जीवघेणा प्रवास धोक्याचा समजून या जिर्णावस्थेतील पुलावरूनचं जीवघेणा प्रवास करत आहेत.

ग्रामीण भागातील मजूरवर्ग भंडाऱ्यात रोजगारासाठी येतात. तर, शहरातून ग्रामीण भागात जाणारे नोकरदारवर्ग याच मार्गाचा वापर करीत आहेत. नागरिक या पुलावरून जीवघेणा प्रवास का करतात, हे एबीपी माझानं जाणून घेतलं असता. कारधा येथून वैनगंगा नदीच्या नवीन पुलाला जोडणारा डायव्हर्शन तयार करण्यात आलं नसल्यामुळेच लहान आणि जीर्ण पुलाचा वापर प्रवासी, नागरिक करीत असल्याची प्रतिक्रिया काही ग्रामस्थांनी दिली.

पुलावरील सूचनाफलक अन् बॅरिकेटस गायब

काही महिन्यांपूर्वी वैनगंगा नदीवरील कारधा नदीवरील पुल धोक्याचा असल्यानं बॅरिकेटिंग आणि सूचना फलक लावून बंद करण्यात आला होता. मात्र, आता हे बॅरिकेटिंग आणि सूचनाफलक येथे दिसून येत नाही. त्यामुळे याबाबत प्रशासनानेच आता खुलासा करणे योग्य आहे. हा पूल ज्या राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडं आहे, त्या अधिकाऱ्यांची बाजू जाणून घेण्याचा प्रयत्न केला असता ते अधिकारी शासकीय कामाकरिता भंडारा शहराच्या बाहेर असल्यानं त्यांची प्रतिक्रिया किंवा पुलाबाबतची अधिकृत माहिती मिळू शकली नाही.

## ‘जलसंधारण’ प्रत्येकाचे कर्तव्य!

भारतीय हवामान खात्याने यावर्षी सरासरीपेक्षा जास्त पाऊस होईल असा अंदाज वर्तवला आहे. यावर्षी पाऊस लवकर येईल असाही अंदाज हवामान खात्याने वर्तवला होता तो खरा ठरताना दिसत आहे. ७ जूनला महाराष्ट्रात दाखल होणारा मान्सून यावर्षी २५ मे रोजीच दाखल झाला आहे. पाऊस लवकर आल्याने बळीराजाची चिंता दूर झाली आहे. पाऊस लांबला की पेरण्या लांबतात आणि पेरण्या लांबल्या की बळीराजाचे पुढील सर्व नियोजन कोलमडते. सुदैवाने राज्यात वेळेवर पाऊस सुरू झाल्याने राज्यातील अनेक भागात होणारी पाणीटंचाई मिटली आहे. सध्या राज्यात सर्वदूर पावसाने हजेरी लावली आहे. विदर्भ, कोकण, पश्रिचम महाराष्ट्रासह मराठवाड्यातही दमदार पाऊस कोसळत आहे. मान्सूनपूर्व पावसानेही राज्यात चांगलाच धुमाकूळ घातला होता. आताही राज्यात दमदार पाऊस पडत आहे. राज्यात दमदार पाऊस पडत असल्याने धरणातील पाणी साठाही वाढत आहे. उजनी सारखे मोठे धरण आताच ४० टक्के भरले आहे. राज्यातील सर्व नद्या,नाले, तलाव, ओढे ओसंडून वाहत आहेत. वरुण राजाने यावेळी चांगलीच कृपा केल्याने सर्वत्र आनंदाचे वातावरण आहे. धरणीमाईही चिंब भिजून हिरवा शालू पांघरत आहे. गेल्या काही वर्षात राज्यात अपुरा पाऊस पडल्यामुळे दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली होती. विशेषतः विदर्भ आणि मराठवाड्यात पाण्याची मोठी टंचाई निर्माण झाली होती. हंडाभर पाण्यासाठी नागरिकांना कैक किलोमीटरची पायपीट करावी लागत होती. पाण्यासाठी दाही दिशा.... अशी लोकांची अवस्था झाली होती. सुदैवाने यावर्षी सरासरीपेक्षा जास्त पाऊस होणार असल्याने पाणी टंचाई मिटली आहे असे असले तरी पावसाचे पाणी वाया जाणार नाही याची दक्षता घ्यायला हवी. यावर्षी पडणाऱ्या पावसाच्या पाण्याचे योग्य नियोजन आणि वापर करावा लागणार आहे. यावर्षी सरासरीपेक्षा अधिक पाऊस पडणार असल्याने पावसाचे पाणी वाया जाणार नाही याची दक्षता घ्यावी लागणार आहे. पावसाच्या जास्तीतजास्त पाण्याची बचत कशी होईल याचे नियोजन आतापासूनच करावे लागणार आहे. जमिनीवर पडणाऱ्या पावसाच्या पाण्याचे योग्य नियोजन नसल्यामुळे बरेचसे पाणी वाया जाते. कमी पाऊस पडणाऱ्या भागात तर हा पाण्याचा अपव्यय होय. महाराष्ट्रात पडणाऱ्या पावसाचा विचार करता आपल्याकडे पाणी जिरवणे आणि पाणी साठवणे या दोन तंत्राची खूप जरुरी आहे. पाणी साठवण्यापेक्षा पाणी जिरवण्याचा फायदा असा की भूगर्भातील पाण्याचे बाष्पीभवन होत नाही व त्यात घट होत नाही. जलव्यवस्थापन याचा अर्थ धरणे बांधून, पाईपलाईन शहरापर्यंत नेऊन घरोघरी पाणी पोहचवणे असा नाही. जलव्यवस्थापन याचा अर्थ समाज व पाणी यांच्यातील संबंध प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करणे. त्यासाठी पाण्याच्या प्रत्येक थेंबाचे महत्व पटवून देणे. पावसाचे पाणी वाया जाऊ नये यासाठी पाण्याचे व्यवस्थापन कसे करावे याचे शाळा, कॉलेजमधील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करायला हवे. यासंदर्भात नागरिकांचेही प्रबोधन व्हायला हवे. नदी, विहीर, तलाव, बंधारे यात पावसाचे जास्तीतजास्त पाणी कसे साठेल याचे नियोजन सरकारी पातळीवर व्हायला हवे. नागरिकांनी आपल्या घरात, सोसायटीत रेन वॉटर हार्वेस्टिंग सिस्टीम बसवावी. शाळा, कॉलेज तसेच सरकारी कार्यालयातही रेन वॉटर हार्वेस्टिंग सिस्टीम बसवावी. पावसाच्या पाण्याची साठवणूक म्हणजे पर्जन्य जलसंधारण प्रत्येक घरात, सोसायटीत, कार्यालयात झाले पाहिजे. कुठल्याही परिस्थितीत पावसाचे पाणी वाया जाणार नाही याची दक्षता घ्यायला हवी. पाण्याचा थेंब न थेंब महत्वाचा आहे. कारण पाण्याची बचत हीच पाण्याची निर्मिती आहे. पाण्याची बचत करणे हे प्रत्येकाचे कर्तव्यच आहे कारण ती काळाची गरज आहे. भविष्यात दुष्काळ पडू नये असे वाटत असेल तर पर्जन्य जलसंधारण करावेच लागेल.

# शेतकऱ्यांनी पेरणीअगोदर उगवण क्षमता तपासून पेरण्या करावे : कृषिदूतांनी केले शेतकऱ्यांना आवाहन

दैनिक आपला विदर्भ

■ महेबुब शेख

**उमरखेड :** उमरखेड येथील कृषी महाविद्यालयतील कृषीदुतानी बियाणे उगवण क्षमता तपासून पेरणी केल्यास शेतकऱ्याचा अनावश्यक खर्च कमी होऊन झाडांची सरासरी प्रमाण राहण्यात मदत होते. तरीही सर्व शेतकऱ्यांनी पेरणीअगोदर उगवण क्षमता तपासून पेरण्या करावे असे आवाहन करीत कृषिदूतांनी नागेशवाडी येथिल शेतीच्या बांधावर जाऊन शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले

मान्सून दाखल झालेला असून सर्व शेतकऱ्यांची पेरणी सुरू झालेली आहे. पेरणी योग्य पाऊस पुढील दोन-तीन दिवसात होईल, असा अंदाज हवामान खात्याने वर्तविला आहे. उमरखेड तालुक्यामध्ये सोयाबीन पिकाची लागवड मोठ्या प्रमाणात होत असून प्रमाणित व दर्जेदार बियाणे महत्त्वाचे झाले आहे. बियाणे नवे असो किंवा घरचे जूने पेरणीपूर्वी सदर बियाण्याची उगवण क्षमता तपासणे अत्यावश्यक असल्याचे मार्गदर्शन कृषीदूत साहिल रोकडे, तेजस जाधव, श्रेयश गोविंदवार, वैभव काकडे, उत्कर्ष चव्हाण, कृष्णा ठाकरे यांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. तसेच कृषिदूतांनी शेतकऱ्यांच्या शंकेचे निराकरण केले. याकरिता प्राचार्य एस. के. चिंतले, ग्रामीण कृषी कार्यानुभव कार्यक्रम अधिकारी ए. बी. इंगळे, वाय. एस. वाकोडे, ए. एस. राऊत तसेच विषय तज्ज्ञ डॉ. एस. बी. मातीखाये यांचे मार्गदर्शन लाभले. व तसेच गावातील सरपंच रामदास जटाळे उपसरपंच सौ.सीमा अनिल सुरोशे तंटामुक्ती अध्यक्ष विलास सुरोशे प्रगतिशील शेतकरी सुदर्शन सुरोशे ,शिवशंकर सुरोशे, कैलास पतंगे, संतोष सुरोशे, सुभाष सुरोशे, ज्ञानेश्वर सुरोशे, संभाजी सुरोशे, सुरेश कदम, आत्माराम सुरोशे, सुधाकर सुरोशे, व इतर गावकरी उपस्थित होते.



## विकृत पुरुषप्रधान मानसिकतेचे प्रतिनिधी भरत गोगावले आहेत- जयश्री शेळके

**बुलढाणा/प्रतिनिधी :** रश्मी ठाकरे यांच्यामुळेच पक्षात फूट पडली असा गौप्यस्फोट भरत गोगावले यांनी केला. त्यावर ठाकरेंची शिवसेना आक्रमक झाली असून, काहीच जमत नसेल तर स्वतःच्या नाकर्ते पणाचे खापर महिलांवर फोडून मोकळ व्हायचं.अशा विकृत पुरुषप्रधान मानसिकतेचे प्रतिनिधी भरत गोगावले आहेत.असा पलटवार ठाकरेंच्या शिवसेनेच्या प्रवक्त्या जयश्री शेळके यांनी केला आहे. पालकमंत्री पदासाठी भरत गोगावले यांना एक महिला धोबीपछाड देत आहे.आणि त्यातूनच आलेल्या वैफल्यातून त्यांच्याकडून अशी वक्तव्य केली जात असल्याचही जयश्री शेळके यांनी म्हटलं आहे.



## अहिल्यानगर जिल्ह्यासह शेवगाव तालुक्यामध्ये पेरणीच्या कामाला सुरुवात




**अहिल्यानगर/प्रतिनिधी :** अहिल्यानगर जिल्ह्यासह शेवगाव तालुक्यामध्ये सर्व दूर मोठा पाऊस झाल्याने शेतकरी वर्गामध्ये समाधानाचे वातावरण आहे. आता काही दिवसांपासून पावसाने उघड दिल्याने शेतकरी आता मशागती करून पेरणीच्या कामाला लागले आहेत. शेतामध्ये कापूस तूर मूग बाजरी ह्यासारख्या पिकांची पेरणी सध्या चालू आहे. एकंदरीतच चांगल्या पावसामुळे शेतकरी वर्गामध्ये आनंदाचेवातावरणआहे.

## नीट-यूजी परीक्षेत वसंतराव नाईक कृषी माध्यमिक विद्यालय बिटरगाव (बु) येथील रोहन दामोदर खर्चेची यशाला गवसणी

दैनिक आपला विदर्भ

■ महेबुब शेख

**उमरखेड :** वैद्यकीय पदवी प्रवेश परीक्षा नीट चा निकाल शनिवारी जाहीर झाला असून वसंतराव नाईक कृषी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय बिटरगाव बुद्रुक येथील विद्यार्थी रोहन दामोदर खर्चे यांनी ही परीक्षा उत्तीर्ण केली आहे. बिटरगाव बुद्रुक वसंतराव नाईक कृषि माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालय येथील प्राचार्य दामोदर खर्चे यांचा मुलगा असून त्याने७२० पैकी ५७८ गुण प्राप्त केले आहे. वसंतराव नाईक कृषी माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालय बिटरगाव बुद्रुक येथील नाव लौकीक केले असून रोहन दामोदर खर्चे या गुणवंत विद्यार्थ्यांचे वैद्यकीय क्षेत्रात उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल अहिल्यादेवी होळकर स्मारक संस्थेचे सचिव अँड. दिलीप एडतकर, शाळा व्यवस्थापक पुंजाराम डोंगे तसेच संस्थेचे कार्यवाहक अनिल चेंडकाळे, प्राचार्य डी.एम खर्चे, उपमुख्यध्यापक आर यु काटोले, प्राध्यापक एस सी आंडगे एस एस काळे एस एस काळबांडे ए टी माने नरेंद्र दुधे जगदीश वाळूकर गजानन निरटवाड तसेच शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी रोहन दामोदर खर्चे याला पुढील भविष्याच्या उज्वल वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. व विद्यार्थ्यांचे कौतुक करुन अभिनंदन केले. तसेच प्राचार्य दामोदर खर्चे व स्वाती दामोदर खर्चे यांचे सुद्धा संस्थेच्या वतीने अभिनंदन करण्यात आलेया यशाबद्दल शाळेचे प्राचार्य, शिक्षकवर्ग व नातेवाईक यांनी रोहनचे अभिनंदन केले असून त्याच्या भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.



## पाळधी येथे जिल्हा परिषद शाळा प्रवेशोत्सवात पालकमंत्री गुलाबराव पाटील यांची उपस्थिति





**जळगाव/प्रतिनिधी :** शैक्षणिक वर्षाला आजपासून सुरुवात झाली असून, राज्यभरातील जिल्हा परिषद शाळांमध्ये शाळा प्रवेशोत्सव साजरा केला जात आहे. दरम्यान जळगाव जिल्ह्यातील पाळधी येथे पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी जिल्हा परिषद शाळेत शाळा प्रवेशोत्सवात सहभाग घेत, इयत्ता पहिलीच्या विद्यार्थ्यांना थेट बैलगाडीवरून घेऊन गुलाबराव पाटील हे शाळेत दाखल झाले. तसेच विद्यार्थ्यांसोबत शाळेत सेल्फी काढून गुलाबराव पाटलांनी विद्यार्थ्यांचे शाळेत स्वागत केले. तसेच गुलाबराव पाटलांनी शालेय पाठ्यपुस्तके व दप्तरांचे देखील विद्यार्थ्यांना वाटप केले. याप्रसंगी गुलाबराव पाटलांनी आपल्या शाळेच्या पहिल्या दिवसाचा अनुभव सांगत शाळेच्या जुन्या आठवणींना उजाळा दिला आहे. आपण ज्या शाळेत शिकलो त्याच शाळेत आज प्रवेश उत्सवाच्या निमित्ताने हजर राहता आले, याचा आनंद असल्याचं ही मंत्री पाटील यांनी म्हटल आहे.

## शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला धोका नाही- अनिल पाटील





**सिंधुदुर्ग/प्रतिनिधी :** मागील आठवड्यात मी या ठिकाणी भेट दिली होती. त्यावेळी थोडे क्रॅक मला दिसले होते. याची माहिती मी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना दिली होती. परंतु, काल भरपूर पाऊस झाल्याने माती घसरली. भराव जो खचला होता तो बाजूला केला असून डागडुजी केली आहे. एकंदरीत शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला धोका नाही. आज सार्वजनिक बांधकाम विभाग मुख्य अभियंता शरद राजभोज यांनी येथील पाहणी केली असून त्यांनी आवश्यक त्या सूचना दिल्या आहेत.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## संक्षिप्त...

### शाळेचा पहिला दिवस मंत्र्यांच्या उपस्थितीत साजरा

दैनिक आपला विदर्भ

**इगतपुरी/प्रतिनिधी :** आज शाळेचा पहिला दिवस मुख्यमंत्री दोन्ही उपमुख्यमंत्री यांनी घेतलेल्या निर्णयानुसार पहिल्या दिवशी मंत्री नरहरी झिरवळ यांनी शाळेत जाऊन पहिला दिवशी विद्यार्थ्यांचे आगळ्या वेगळ्या पद्धतीने विद्यार्थ्याच स्वागत केले. मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांनी शाळेच्या पहिल्या दिवशी लोकप्रतिनिधीने शाळेत नवीन घेणारे विद्यार्थी आणि त्यांचे पालक यांच्याबरोबर हितगुज करावी, असे निर्देश लोकप्रतिनिधींना दिले होते. त्यानुसार मंत्री नरहरी झिरोळ यांनी शाळेत जाऊन विद्यार्थ्यांचे स्वागत केले असता, यावेळी वेगवेगळ्या अडी अडचणीचा पाढाही ह्या ठिकाणी वाचवा. शक्यतो अडचणीचा पाढा वाचण्यापेक्षा मुलांना शुभेच्छा द्यावेत. अशा दृष्टीने हा कार्यक्रम आयोजित केला होता. मुख्यमंत्री महोदयांनी जिथली शाळा तुम्हाला सोयीस्कर असेल तिथे जायला सांगितले होते. आदिवासी विकास मंत्री महोदयांनी नाशिक जिल्ह्यातील मुंढेगाव येथील आश्रम शाळेत येऊन पहिल्या दिवस साजरा करण्याचा मान दिला.विद्यार्थी गणवेशापासून वंचित आहेत, त्यावर साहेब बोलतील आजचा शाळेचा पहिला दिवस आहे, त्यापद्धतीनेच प्रश्न विचारा, असे मत अन्न आणि औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केले.

### कुंडमळा पूल धोकादायक होता जिल्हाधिकाऱ्यांनीही जाहीर केलं होत देवेंद्र फडणवीस यांची माहिती

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** कुंडमळा पूल धोकादायक होता, जिल्हाधिकाऱ्यांनीही जाहीर केलं होत. अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माध्यमांशी बोलताना दिली. यावेळी ते म्हणाले की, पालघर शाळा विद्यार्ध्यांची शिकण्याची चांगली जिज्ञासा आहे. शाळेत अतिशय चांगलं शिक्षण मिळतंय, पालक पण सांगतात. वाढवणं बंदरामध्ये स्थानिकांना रोजगार मिळावा हाच आमचा प्रयत्न आहे. स्थानिक तरुणांना प्राध्यान्य दिलं जाणार आहे. कुंडमळा पूल धोकादायक होता, स्थानिकांनी तशी पाटी देखील लावली होती. जिल्हाधिकाऱ्यांनी ही पूल धोकादायक झाल्याचं जाहीर केलं होतं.अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

### शिवसेनेसोबत काँग्रेस आणि शरद पवार राहणार नाहीत : सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांची प्रतिक्रिया

**छत्रपती संभजी नगर/प्रतिनिधी :** भविष्यात शिवसेना उबाठा सोबत काँग्रेस आणि शरद पवार राहणार नाहीत.अशी प्रतिक्रिया मंत्री संजय शिरसाट यांनी माध्यमांशी बोलताना दिली. ते म्हणाले की, सर्व शाळेत लोकप्रतिनिधी, अधिकारी यांची उपस्थिती आहे. खऱ्या अर्थाने विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्याचा काम शासनाने केले आहे. गरीब घरातील २५ हजार विद्यार्थांना मोफत छत्री वाटप केली. केंद्र शासनाने जाहीर केलेली ही योजना आहे. जनगणना सुरू होत आहे चांगली गोष्ट आहे. मावळची घटना अत्यंत दुर्दैवी आहे. त्या कामाची वर्क ऑर्डर झाली होती.कामाला सुरुवात करणार होते. मात्र, दुर्घटना घडली. अजित पवार अंबानी वक्तव्य, मला माहित नाही काय बोलले. यांनी देश सोडून जाऊ नये, काय युती करायची दोघांनी करावी. नेत्यांना जनभावना राखावी लागते. मात्र हे जनभावना राखतील का हा प्रश्न आहे. तटकरे गोगावले वाद पारंपरिक वाद आहे, ते मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री पाहतील. वंचित काँग्रेस सोबत जाणार नाही. निवडणूक जशी जवळ येईल, तसे मुंबई बाबत ते असेच वक्तव्य पाप झाकण्यासाठी करणार आहेत.महाराष्ट्र पूर्वीचा वेगळा, आता यांनी युती केली ते वेगळं, भविष्यात काँग्रेस यांच्यासोबत राहणार नाही. शरद पवारही सोबत राहणार नाहीत. अशी प्रतिक्रिया सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी माध्यमांशी बोलताना दिली.

### चोपडा तालुक्यात शालेय विद्यार्थ्यांच्या घोड्यावर बसून मिरवणूक

**जळगाव/प्रतिनिधी :** आज पासून महाराष्ट्रात बहुतेक भागामध्ये शाळा सुरू होत आहे. शाळेच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांचे स्वागत प्रवेश उत्सव सोहळा घ्यावा. असा महत्त्वपूर्ण उपक्रम राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा असल्याने जिल्हाधिकारी यांनी सर्व शालेय शिक्षण विभागाला परिपत्रक काढून विद्यार्थ्यांच्या स्वागत सोहळा प्रवेशोत्सव घेण्याचे आदेश देण्यात आले होते. त्यानुसार १०० शाळांना भेटी या उपक्रमाद्वारे जिल्ह्यातील व स्थानिक लोकप्रतिनिधी आणि अधिकाऱ्यांनी त्यांना सांगितलेल्या शाळेत उपस्थित राहून विद्यार्थ्यांचे स्वागत व शालेय दप्तर व पाठ्यपुस्तक वाटप करण्यात आले. चोपडा तालुक्यातील अडावद येथे आमदार प्रा. चंद्रकांत सोनवणे यांच्या उपस्थितीत विद्यार्थ्यांच्या प्रवेश सोहळा संपन्न झाला. तर ठिकठिकाणी वेगवेगळ्या पद्धतीने विद्यार्थ्यांचा पहिल्या दिवशी स्वागत व सत्कार करण्यात आला. चुंचाळे येथे विद्यार्थ्यांना घोड्यावर बसवून गावातून वाजत गाजत प्रभात फेरी काढण्यात आली.

# दुर्घटना घडल्यानंतर तरी संजय राऊत यांनी राजकारण करू नये

## प्रताप सरनाईक यांची संजय राऊत वर टीका

दैनिक आपला विदर्भ

**ठाणे /प्रतिनिधी :** इंद्रायणी वरील पुलाबाबत आम्हीही हळहळ व्यक्त केली. तो पूल गंजलेल्या होता.अशा दुर्घटना घडल्यानंतर तरी संजय राऊत यांनी राजकारण करू नये, अशी टीका परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी माध्यमांशी बोलताना केली. यावेळी ते म्हणाले की, खासदार, आमदार सगळेच जण प्रवेशोत्सव साजरा करीत आहेत.मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री सुद्धा त्या त्या ठिकाणी गेले आहेत. ही शाळा आम्ही लहानपणापासून पहात आहोत. त्यामुळे ह्या शाळेवर विशेष प्रेम आहे. आता पटसंख्या कमी झालेली आहे. जास्त संख्येने विद्यार्थी इंग्रजी शाळेत शिक्षण घेण्यासाठी जात असल्याने मराठी शाळेची परिस्थिती दयनीय आहे हे वस्तुथिती नाकारता येत नाही. विद्यार्थ्यांना आणि पालकांना प्रोत्साहन देण्यासाठी हा कार्यक्रम घेतलेला आहे. विद्यार्थ्यांनी येऊन फक्त शिकावे बाकी सगळी जबाबदारी राज्यशासनानी घेतलेली आहे. राज्यात कुठेही मराठी भाषेला दुय्यम दर्जा देत असेल अशा शाळेवर कारवाई करण्यात येईल. अतिरिक्त आयुक्तांना सूचना दिलेली आहे. निर्धावलेले अशा कोणत्याही शाळेने भूमिका घेतली असेल तर शाळेची मान्यता रद्द करण्याची भूमिका महापालिका आणि राज्य शासनाची असेल. गरज पडल्यास आमचे शिवसैनिक पाठवून आमच्या पद्धतीने धडा शिकवू, मोठ्या प्रमाणात पाऊस आल्यावर जमीन खचली जाते. त्या भागातल्या इंजिनियर्सनी काळजी घेतली नसेल तर, त्यांच्यावरही कारवाई होईल.



तुळजाभवानी संपूर्ण जगाची माता आहे. शिवाजी महाराजांना भवानी तलवार दिली होती.भारतमाता अशी विश्लेषण देणे योग्य नाही. मी तुळजाभवानीचा निस्सिम भक्त आहे.भारतमाता सर्वांना प्रिय आहे. ६६.६६ टक्के विद्यार्थ्यांना प्रवास मोफत असतो .विद्यार्थी पासेस काढण्यासाठी रांगेत उभे रहावे लागते. शैक्षणिक वेळ त्यांचा खर्च होतो. विद्यार्थ्यांचा शैक्षणिक वेळ वाया जाणार नाही, पासेस शाळेत पाठवू. राज्याला नैसर्गिक आपत्तीला सामोरे जावे लागत आहे.त्यावेळेस एसटी महामंडळ सगळ्यात आधी पुढे जाते. जर अशी काही घटना घडली तर, एसटी महामंडळ सर्वात पुढे असेल अशी भूमिका राहील अशी प्रतिक्रिया प्रताप सरनाईक यांनी माध्यमांशी बोलताना दिली.

### अकोला जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बिरसा क्रांती दलाच्या वतीने धरणे आंदोलन

**अकोला/प्रतिनिधी :** अकोला शहरातल्या जिल्हाधिकारी कार्यालयावर बिरसा क्रांती दलाच्या वतीने धन्य आंदोलन करण्यात आले आहे. सुप्रीम कोर्टाने सहा जुलै २०१७ जो निर्णय दिला त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी. आणि त्वरित आदिवासींची नोकर भरती सुरू करण्यात यावी व सण २०२५ २६ च्या अर्थसंकल्पात आदिवासी विभागाला मिळालेल्या तरतुदीचा निधी इतरत्र न वळविता तो आदिवासींच्या योजनेवर खर्च करण्यात यावा. या अशा विविध मागण्यासाठी बिरसा क्रांती दलाच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन सुरू केले आहे.

### सजवलेल्या बग्गीतून नविन प्रवेश घेतलेल्या चिमुकल्या मुलांची मिरवणूक



**जळगाव/प्रतिनिधी :** सजवलेल्या बग्गीतून नविन प्रवेश घेतलेल्या चिमुकल्या मुलांची वाजत गाजत ढोल ताशांच्या गजरात भव्य मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीत जळगाव जिल्ह्यातील पाचोरा नगरपालिकेचे मुख्याधिकारी मंगेश देवरे व दुर्गेश सोनवणे यांच्या उपस्थितीत झालेल्या नवीन विद्यार्थ्यांचे खडकदेवळा खुर्द जिल्हा परिषद शाळेत प्रवेशचे पहिले पाऊल उत्साहात साजरा करण्यात आले. जळगाव जिल्ह्यातील पाचोरा तालुक्यातील खडकदेवळा खुर्द येथे इयत्ता पहिलीत नवीन प्रवेश घेतलेल्या चिमुकल्यांचे पाचोरा मुख्याधिकारी मंगेश देवरे, नगरपालिकेचे दुर्गेश सोनवणे, सरपंच पती सुदाम वाघ, उपसरपंच नामदेव दाभाडे, पोलिस पाटील तुकाराम तेली, मुख्याध्यापक रविंद्र शिंदें, खडकदेवळा खुर्द जिल्हा परिषद शालेय शिक्षण समितीचे अध्यक्ष हनिफ शेख, उपाध्यक्ष वाल्मिक दाभाडे, सदस्य बापु पाटील, गणेश तेली, गजानन मगरुळे यांच्या वतीने अनोख्या पद्धतीने स्वागत करण्यात आले. सजवलेली बग्गीतून गावात ढोल ताशांच्या गजरात भव्य दिव्य मिरवणूक काढण्यात आली. आज दि.१६ जून २०२५ रोजी जळगाव जिल्ह्यातील पाचोरा तालुक्यातील खडकदेवळा खुर्द जिल्हा परिषद प्राथमिक शाळा येथे इयत्ता पहिलीच्या च्या नवीन दाखलपात्र विद्यार्थ्यांसाठी शाळा प्रवेशोत्सव उत्साहात व आनंददायी वातावरणात संपन्न झाला. यावेळी इयत्ता पहिलीत दाखल पात्र विद्यार्थ्याचे बग्गीत बसून इयत्ता पहिलीत प्रवेश घेतलेल्या नविन मुलांची ढोल ताशांच्या गजरात भव्य मिरवणूक गावामधून काढण्यात आली. यामध्ये शाळेतील सर्व विद्यार्थी, शिक्षक व पालक सहभागी झाले होते. इयत्ता पहिलीच्या विद्यार्थ्यांचे गुलाबपुष्प, गणवेश व पाठ्यपुस्तक देऊन स्वागत करण्यात आले. या कार्यक्रम प्रसंगी खडकदेवळा खुर्द गावचे सरपंच पती सुदाम वाघ, पाचोरा नगरपालिकेचे मुख्याधिकारी मंगेश देवरे, उपमुख्यधिकारी दुर्गेश सोनवणे, शालेय शिक्षण समितीचे अध्यक्ष हनिफ शेख, उपाध्यक्ष वाल्मिक दाभाडे, पोलिस पाटील तुकाराम तेली, उपसरपंच नामदेव दाभाडे, सदस्य बापु पाटील, मुख्याध्यापक रविंद्र शिंदें, शिक्षक शरद पाटील, गजानन मगरुळे, गणेश तेली, वाल्मीक तेली, ज्ञानेश्वर बनसोडे, गोपाल सुर्यवंशी, सोपान तेली सह गावातील पालकवर्ग उपस्थित होते.

### सोनाली बेंद्रेच्या गाण्याचं पन्हाळ्यावर शूटिंग, पाऊस-थंडीने कुडकुडली, तळपायाला ब्रँडी घासण्याची वेळ!

**मुंबई/प्रतिनिधी :** अभिनेता आमिर खान आणि अभिनेत्री सोनाली बेंद्रे यांचा हा सिनेमा १९९९ मध्ये प्रेक्षकांच्या भेटीला आला होता. आमिर खानच्या यशस्वी चित्रपटांमध्ये या सिनेमाचं नाव घेतलं जातं. या सिनेमातील प्रत्येक पात्राचं एक खास नाव आहे. एसीपी राठोड, गुलफाम हसन, मिर्ची सेठ, इन्स्पेक्टर सलीम, बाला ठाकुर असे एकसे बढकर एक कॅरेक्टर या चित्रपटात पाहायला मिळतात. हा चित्रपट पाकिस्तानकडून भारतात सुरु असलेल्या कुरापतींवर आहे. शिवाय भारतातील गुन्हेगारीविरोधात लढणाऱ्या एका पोलीस ऑफिसरची ही कहाणी आहे.

अभिनेता आमिर खानने एसीपी राठोडची भूमिका अगदी व्यवस्थितरित्या पार पाडलीये. मात्र, चित्रपटात आणखी एक महत्त्वाचा अँगल आहे. तो म्हणजे प्रेमाचा...एसीपी राठोडची कॉलेजपासूनची लव्ह स्टोरी या सिनेमात दाखवण्यात आली आहे. आमिर खानच्या प्रेयसीची भूमिका अभिनेत्री सोनाली बेंद्रे हिने निभावली आहे. कॉलेजपासूनचं दोघांचं प्रेम फुललेलं पाहायला मिळतं. दरम्यान, अभिनेत्री सोनाली बेंद्रे हिने नुकतीच एक मुलाखत दिली. तिने या मुलाखतीत या सिनेमातील या गाण्याबाबत मोठा खुलासा केलाय. सोनाली बेंद्रे काय काय म्हणाली? जाणून घेऊयात...

सोनाली बेंद्रे हिने ला मुलाखत दिली. यावेळी तिच्या सिनेक्षेत्रातील करिअरमधील महत्त्वाचे फोटो दाखवण्यात आले आणि त्यावेळीच्या आठवणी काय आहेत? याबाबत विचारणा करण्यात आली. दरम्यान, यावेळी सोनालीला सिनेमातील या गाण्यातील फोटो दाखवण्यात आला होता. यावर बोलताना सोनाली बेंद्रे म्हणाली, या गाण्यामध्ये संपूर्णपणे डिझायनर जॉन मॅथ्यू मथान यांचं काम होतं, त्यांनी सगळं ठरवलं होतं. मी नेहमी जॉनला म्हणायचे की या चित्रपटात मी कॉमिक रिलिफ आहे. हा चित्रपट खूप गंभीर विषयावर होता आणि त्यात मी थोडा हलकाफुलका विनोद आणणारी होते. मला ते आठवून हसू येतं.

शूटींग झाल्यावर पायांना ब्रँडी घासावी लागायची

पुढे बोलताना सोनाली बेंद्रे म्हणाली, जो हाल दिल का इधर हो रहा है हे गाणं खूप सुंदर होतं गाण्याचे बोलही खूप छान होता. राजूने हे गाणं केलं होतं. आम्ही या गाण्याचं पन्हाळ्यावर शूटींग करत होतो. त्याठिकाणी डोंगर आणि पावसात हे गाणं शूट झालं. पावसात चक्क १० दिवस आम्ही शूटींग करत होतो. शेवटी शूटींग झाल्यावर पायांना ब्रँडी घासावी लागायची कारण फार थंडीचं वातावरण होतं.

### मुसळधार पावसामुळे तुर्भे रेल्वे स्थानकातील भुयारी मार्गामध्ये पाणीच पाणी; प्रवाशांना पाण्यातून काढावी लागते वाट



**नवी मुंबई/प्रतिनिधी :** काल रात्री पासून नवी मुंबई येथे जोरदार पाऊस सुरू आहे आणि त्यामुळेच जागोजागी पाणी साचायला सुरुवात झालेली आहे. नवी मुंबईतील तुर्भे रेल्वे स्थानक भुयारीमार्गावर पाणी साचल्याने प्रवाशांना अनेक प्रकारच्या समस्यांना सामोरे जावे लागत आहे. प्रवाशांनी सांगितल्याप्रमाणे थोडासा पाऊस झाला तरी लगेच या भुयारीमार्गात पाणी साचते ज्यामुळे येण्याजण्यासाठी अडचण होते. तसेच रेल्वे सेवा देखील विस्कळीत होते त्यामुळे देखील कामावर जाणाऱ्या प्रवाशांना अडचण येते असते आणि दरवर्षी हे असाच होत असल्याचं देखील प्रवाशांनी सांगितले आहे.

# संजय राऊत यांच्या आरोपात काही नावीन्य नाही : मंत्री उदय सामंत यांची टिका

दैनिक आपला विदर्भ

**रत्नागिरी/प्रतिनिधी :** आज मी ज्या शाळेत विद्यार्थ्यांचे स्वागत करायला आलो, त्या शाळेला तिला ऐतिहासिक महत्व आहे. एकीकडे जिल्हा परिषद, नगर परिषद शाळांमध्ये मुलं येत नाहीत असं म्हटलं जाते. या शाळेत पहिल्याच्या वर्गात १८६ ॲडमिशन झाले आहेत.ही शाळा महाराष्ट्रातील स्मार्ट शाळा बनेल

पूल दुर्घटना, संजय राऊत आरोपात तथ्य नाही, असे मत मंत्री उदय सामंत यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केले. यावेळी ते म्हणाले की, भ्रष्टाचार झाला असेल तर चौकशी होईल, तसे सूतोवाच उपमुख्यमंत्री अजित पवार साहेबांनी केले आहेत. असं काही झालं असेल, तर पुढे येईल आणि त्यावर कारवाई होईल.अजित पवार घटनास्थळी दाखल नाहीत. यावर उत्तर अजित पवार देतील. हा विभाग सार्वजनिक बांधकाम विभागाचा आहे. या विभागाचे मंत्री शिवेंद्रसिंहराजे आहेत, ते यावर खुलासा करतील. पण याची चौकशी लागली आहे, एवढं निश्चित. जिथे जिथे नुकसान झालेलं आहे, त्याचे तातडीने पंचनामे करण्याचे आदेश दिले आहेत, ते सुरू देखील झाले आहेत.कोण आमदार फसवत आहेत, हे मी बच्चू भाऊंनी विचारेन. मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री शिंदे साहेबांनी मला तिथे जायला सांगितलं होते.आम्ही सवार्नी सांघिक निर्णय घेऊन, ते आंदोलन मागे घ्यायला लावलेले आहे.भरत गोगावले यांचे सर्व घोटाळे बाहेर काढणार, हे म्हणणारे कोण आहेत.



हे तुम्हालाही आणि मलाही माहिती आहे. मी त्यांच्या म्हणण्याची दखल घेऊन, काही बोलणं हे योग्य नाही. भरतशेठ गोगावले हे शेतकऱ्यांचे नेते आहेत.अनेक संकटं अंगावर घेत ते तिसऱ्यांदा-चौथ्यांदा आमदार, मंत्री झाले आहेत. त्यामुळे त्यांची बदनामी करण्याचा कोणी कितीही प्रयत्न केला, तरी त्यांना काही फरक पडणार नाही. पण महायुतीतल्या आमच्या पक्षातील आणि राष्ट्रवादीच्या लोकांनी देखील समजून घेतलं पाहिजे की, आपली महायुती आणि महायुतीला साजेसं काम झालं पाहिजे.मला याची कल्पना नाही, पण अशी काही वस्तुस्थिती असेल, तर त्या विभागाचे मंत्री उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब आहेत, ते वैयक्तिक त्यामध्ये लक्ष घालतील, चौकशीचे आदेश देतील. आणि नागरिकांना कुठे बाधा होणार नाही, याची दक्षता आम्ही घेऊ, यामध्ये कुठे भ्रष्टाचार झाला असेल, असं कोणाचं म्हणणं असेल तर त्याची चौकशी करू. आज शाळेतील मुलांचं स्वागत करण्याचा दिवस आहे. त्यांचे प्रश्न हे सगळे रोजचे सकाळचे प्रश्न असतात, आम्ही त्यांना उत्तर देत असतो, यामध्ये काही नावीन्य आहे, असं मला वाटत नाही. आपल्याकडे प्रचंड पडतो, त्यामुळे कदाचित हे झालं असेल. कामात भ्रष्टाचार झाला असेल तर चौकशी करू, असे आश्वासन यावेळी उद्योग मंत्री उद्योग मंत्री उदय सामंत यांनी दिले.ली.

## विविध वृत्त...

### शिवसेनेच्या जनता दरबाराला विविध भागातील नागरिकांचा उस्फूर्त प्रतिसाद

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी :** शिवसेनेच्या वतीने १६ जून रोजी शहरातील १६ जून रोजी शिवसेना जनसंपर्क कार्यालय मेहकर येथे शिवसेनेच्या वतीने जनता दरबार घेण्यात आला.यावेळी आ.सिध्दार्थ खरात यांनी मतदारसंघासह विविध भागातून आलेल्या नागरिकांशी संवाद साधत त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. यावेळी उपस्थित नागरिकांनी त्यांना भेडसावणारे विविध प्रकारचे प्रश्न मांडले, त्यांचे प्रश्न जाणून घेतले. तसेच या संदर्भात संबंधित अधिकाऱ्यांना सूचना दिल्या. मतदारसंघातील नागरिकांचा हाच विश्वास सार्थ ठरविण्यासाठी आणि त्यांना दैनंदिन आयुष्यात भेडसावणाऱ्या समस्या सोडविण्यासाठी तसेच शासन दरबारी रखडलेले प्रश्न जलदगतीने मार्गी लावण्यासाठी नियमित स्वरूपात केंद्रीय मंत्री आपल्या भेटीला – जनता दरबार उपक्रमाचे आयोजन करण्यात येत होते.

### आंदोलनाच्या आधीपासूनच माझ्यावर दबाव तंत्राचा वापर : बच्चू कडू यांचा आरोप

दैनिक आपला विदर्भ

**अमरावती/प्रतिनिधी :** आंदोलनाच्या आधीपासूनच माझ्यावर दबाव तंत्राचा वापर केला जात आहे.असा आरोप माजी मंत्री बच्चू कडू यांनी माध्यमांशी बोलताना केला. यावेळी ते म्हणाले की, माझ्या बँकेतील संचालकांकडून देखील मला सांगण्यात आले होते की, तुम्ही बोलू नका, काही अडचणी निर्माण होईल. राज्याच्या मुख्य माणसाच्या दालनात अमरावती जिल्ह्यातील दोन आमदार भेटले आणि त्या ठिकाणी चर्चा झाली. बच्चू कडू यांचे काय मिळते ते बघा सप्टेंबर पर्यंत बच्चू कडू जेलमध्ये जातील अशी व्यवस्था करा.असा आरोप कडू यांनी केला. काहीतरी शोधून काढा तुम्ही तुमच्या लेवलवर आणि प्रशासकीय लेवल वर स्वत: शोधून काढा, तैव्हाच बच्चू कडू यांचा बंदोबस्त करता येईल. आता सुरुवात झाली हे आम्हाला अपेक्षित आहे. हे राजकीय दृष्ट्या करतात यात काही नवल नाही. हे सर्व झाल्यावर आम्ही लढलो आणि टिकलो तर आमची परीक्षा आहे. आमचे सत्व तपासण्याचे दिवस येणार आहे.या संपूर्ण परीक्षेमधून उजळून आम्ही बाहेर निघू असा दावा माजी मंत्री बच्चू कडू यांनी केला.

### मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृह मलकापूर प्रवेश प्रक्रिया सुरु;

दैनिक आपला विदर्भ

### अर्ज करण्याचे आवाहन

**बुलढाणा/प्रतिनिधी :** सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, बुलडाणा जिल्हा बुलडाणा अधिनस्त मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृह, मलकापूर जि.बुलडाणा येथील वसतिगृह प्रवेश प्रक्रिया शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करीता सरु करण्यात आलेली आहे.

मागासवर्गीय प्रवर्ग निहाय आरक्षित टक्केवारीनुसार समाजातील, अनु.जाती, अनु जमाती, विमुक्त व भटक्या जाती, जमाती, इतर मागास प्रवर्ग, विशेष मागास प्रवर्ग, अपंग, अनाथ इत्यादी प्रवर्गातील विद्यार्थीनी प्रवेशास पात्र असतील. शालेय, कनिष्ठ, विद्यालयीन व महाविद्यालयीन मलकापूर येथील नगर परिषद हद्दीतील शाळा, विद्यालय, महाविद्यालय मधील अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षातील प्रवेशीत विद्यार्थीनी प्रवेश अर्ज भरण्यास पात्र राहतील.

प्रवेश अर्ज ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्यात येईल. अर्ज भरण्याकरीता https://hmas.mahait.org या लिंकचा वापर करावा. याअनुषंगाने जास्तीत जास्त विद्यार्थीनींनी प्रवेश अर्ज भरावे. तसेच अधिक माहिती करीता ९४२३७६१४०३ वर संपर्क साधावा किंवा प्रत्यक्ष वसतीगृहाला भेट द्यावी, असे आवाहन वसतीगृहाचे गृहपाल अरुण इंगळे यांनी केले आहे.

### मागासवर्गीय मुलींसाठी मोताळा येथील वसतिगृहात प्रवेश प्रक्रिया सुरु

**बुलढाणा/प्रतिनिधी :** सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, बुलडाणा जिल्हा अधिनस्त मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृह, मोताळा येथील शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करीता प्रवेश प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

ही प्रवेश प्रक्रिया मागासवर्गीय प्रवर्गनिहाय आरक्षण टक्केवारीनुसार असेल. यामध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त व भटक्या जाती-जमाती, इतर मागास प्रवर्ग, विशेष मागास प्रवर्ग, अपंग, अनाथ इत्यादी प्रवर्गातील मुलींना प्रवेशासाठी पात्रता दिली जाणार आहे.

मोताळा नगर पंचायत हद्दीतील शाळा, कनिष्ठ महाविद्यालये व महाविद्यालये येथे शिक्षण घेणाऱ्या आणि अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थिनींना अर्ज भरता येणार आहे.

प्रवेश अर्ज ऑनलाईन पद्धतीने भरावयाचा असून, त्यासाठी https://hmas.mahait.org या लिंकचा वापर करावा. यासंदर्भात वसतिगृहाचे गृहपाल अरुण इंगळे यांनी जास्तीत जास्त विद्यार्थिनींनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले आहे. अधिक माहितीसाठी ९४२३७६१४०३ क्रमांकावर संपर्क साधावा किंवा थेट वसतिगृहाला भेट द्यावी.

# लोकसहभागातून प्रभावी योग दिनाचे आयोजन करा – जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील

## २१ जूनला आंतरराष्ट्रीय योग दिन जिल्हाधिकाऱ्यांनी घेतला तयारीचा आढावा

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** येत्या २१ जून रोजी साजरा होणाऱ्या आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी योग दिनाच्या तयारीसंदर्भात अधिकाऱ्यांची सोमवारी आढावा बैठक घेतली. यावेळी त्यांनी ''लोकसहभागातून प्रभावी योग दिनाचे आयोजन करा'' असे स्पष्ट निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

या बैठकीस निवासी उपजिल्हाधिकारी सुहासिनी गोणेवार , उपजिल्हाधिकारी समाधान गायकवाड, उपजिल्हाधिकारी डॉ. जयश्री ठाकरे, सर्व उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, गटविकास अधिकारी, नगरपरिषदेचे मुख्याधिकारी उपस्थित होते. या बैठकीत योग दिनाच्या आयोजनासाठी सविस्तर चर्चा करण्यात आली.

जिल्हाधिकारी डॉ.पाटील म्हणाले की, ''शहरातील तसेच ग्रामीण भागातील नागरिक मोठ्या संख्येने सहभागी होऊ शकतील अशा मोकळ्या आणि सहज पोहोचता येतील अशा ठिकाणी योग दिनाचे कार्यक्रम आयोजित करावेत. अशा स्थळांची पाहणी करून आवश्यक सोयीसुविधा उपलब्ध करून द्याव्यात.'' लोकप्रतिनिधी आणि संस्थांचा समावेश आवश्यक जिल्ह्यातील आमदार, खासदार, स्थानिक लोकप्रतिनिधी, सामाजिक संस्था, धार्मिक प्रतिष्ठाने, स्वयंसेवी संस्था आणि प्रतिष्ठित नागरिक यांना कार्यक्रमात सहभागी करून घ्यावे, असेही त्यांनी सांगितले. ''योग हा जीवनशैलीचा भाग व्हावा यासाठी प्रत्येक घटकाचा सहभाग महत्त्वाचा आहे,'' असे ते म्हणाले.

योग दिनासाठी प्रशिक्षित आणि अनुभवी योग प्रशिक्षकांची नेमणूक करावी, तसेच शहरासह ग्रामीण भागातील जास्त लोकसंख्या असलेल्या गावांमध्ये कार्यक्रमांचे आयोजन करून योगविषयी जनजागृती करावी, असे निर्देश त्यांनी



दिले.

आरोग्यदायी वातावरण निर्मितीचा उद्देश ''योगा ही फक्त एक कृती नसून आरोग्यदायी जीवनशैलीकडे नेणारी वाट आहे. त्यामुळे नागरिकांनी नियमित योगाभ्यास करावा यासाठी सजगता निर्माण करणे आवश्यक आहे,'' असे जिल्हाधिकारी डॉ. पाटील यांनी स्पष्ट केले.

बैठकीच्या अखेरीस सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करून योग दिनाचा कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडावा. तसेच जिल्ह्यातील नागरिकांनी प्रशासनाने आयोजित केलेल्या योग दिनाच्या कार्यक्रमात मोठ्यासंख्येने सहभागी व्हावे, असे आवाहनही त्यांनी केले.

## कृषी महाविद्यालय रिसोडच्या रावे विद्यार्थ्यांद्वारे बीज प्रक्रिया मोहिम



दैनिक आपला विदर्भ

**रिसोड/प्रतिनिधी :** डॉ पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला सलग्नित कृषी महाविद्यालय रिसोड जिल्हा वाशिम च्या अंतिम वर्षातील ग्रामीण कृषी कार्यानुभव म्हणजेच रावे कार्यक्रमांतर्गत शिकणाऱ्या विद्यार्थी व विद्यार्थिनी यांनी दिनांक १० जून २० २५ ते १६ जून २०२६ या कालावधीत रिसोड तालुक्यातील मौजे घोटा, करडा,मांगवाडी, भोकरखेडा ,कंकरवाडी आणि एकलासपूर या गावात जाऊन सोयाबीन पेरणीपूर्व बीज प्रक्रिया कृती प्रात्यक्षिक व बियाणे उगवण क्षमता पीक प्रात्यक्षिक आयोजित करून या बाबीसाठी जास्तीत जास्त शेतकऱ्यांना प्रोत्साहित केले प्रत्येक निवडलेल्या गावामध्ये गावचे सरपंच या कृती प्रात्यक्षिकाचे अध्यक्षस्थानी होते तर कृषी विज्ञान केंद्र करडा वाशिमचे कीटक शास्त्रज्ञ तथा तांत्रिक समन्वय कृषी महाविद्यालय रिसोड राजेश डवरे यांनी तज्ञ मार्गदर्शकाची भूमिका पार पाडली व एकंदरच शेतकरी बंधूंना आगामी खरीप हंगामा करिता राजेश डवरे यांनी विद्यापीठाने शिफारस केलेल्या कमी खर्चाच्या तंत्रज्ञानाच्या टीप्स दिल्या व शेतकऱ्यांनी विचारलेल्या विविध खरीप पिकाबद्दलच्या शंकांचे निरसन केले कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर आशिष आपतुरकर यांनी याप्रसंगी कृषी महाविद्यालयाच्या विविध कौशल्य प्रदान करणाऱ्या व रोजगार निर्मितीच्या अभ्यासक्रमाविषयी प्रकाश टाकला या संपूर्ण बीज प्रक्रिया मोहिमेचे समन्वयक म्हणून विविध गावात प्रा डी टी बोरकर, प्रा कृष्णा देशमुख,प्रा गणेश हरणे, प्रा विठ्ठल बोडके ,प्रा निलेश खडसे व प्रा निलेश कंकाळ यांनी कार्य पार पाडले या मोहिमेकरिता कृषी महाविद्यालयाचे रावे कार्यक्रमाधिकारी डॉ परमेश्वर देवडे यांनी संपूर्ण नियोजन केले व या मोहिमेच्या यशस्वी आयोजनासाठी कृषी महाविद्यालय रिसोड येथील विद्यार्थी कु श्रेया जाधव, कु नयना कंकाळ कु आदिती फुंडकर,यश मकेश्वर, साहिल देशमुख ,प्रतीक घायाळ ,ऋषिकेश अपार यासह इतर विद्यार्थी व विद्यार्थिनी यांनी व कृषी महाविद्यालयाच्या संपूर्ण कर्मचारी वृंदांनी अथक परिश्रम घेतले.

### पंकजा मुंडेंना निवेदन देण्यासाठी आलेल्या शेतकऱ्याला ढकलणाऱ्या पोलीस निरीक्षकाला बडतर्फ करण्याची मागणी

**जालना/प्रतिनिधी :** दोन दिवसांपूर्वी जालन्यात पालकमंत्री पंकजा मुंडेंना निवेदन देण्यासाठी आलेल्या शेतकऱ्याला पोलिस निरीक्षक संतोष साबळे यांनी ढकलून जमिनीवर पाडलं होतं. पंकजा मुंडे यांनी जिल्हा नियोजन समितीची बैठक घेतल्यानंतर हा प्रकार घडला होता. दरम्यान शेतकरी गजानन उगले या शेतकऱ्याला ढकलून देणाऱ्या पोलीस निरीक्षक साबळे यांना पोलीस सेवेतून बडतर्फ करण्यात यावं. या मागणीसाठी आज जालन्यातील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर शेतकऱ्यांनी निदर्शने करत पोलीस प्रशासन आणि जिल्हा प्रशासनाचा निषेध नोंदवला. तसेच प्रशासना विरोधात जोरदार घोषणाबाजी केली.

### बुलढाण्यात हरितक्रांती व माझी वसुंधरा सुंदर अभियान अंतर्गत १ कोटी रुपये किमतीच्या वृक्षारोपण कार्यक्रमास सुरुवात



दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** बुलढाणा शहरामध्ये विधानसभा मतदारसंघाचे आमदार तथा शिवसेना जिल्हा संपर्कप्रमुख संजय गायकवाड यांच्या संकल्पनेतून हरितक्रांती व हरितपट्टा माझी वसुंधरा अभियान अंतर्गत संपूर्ण बुलढाणा शहरामध्ये १ कोटी रुपये किमतीची उच्च प्रतीचे वृक्ष लागवड संपूर्ण बुलढाणा शहरामध्ये वृक्षारोपण केले जाणार आहे. आज या वृक्षारोपणाची सुरुवात शिवसेना आमदार संजय गायकवाड यांनी केली. बुलढाणा शहरातील शिवाजी हायस्कूल समोरील टाटा ग्राउंडच्या खुल्या मैदानामध्ये आमदार संजय गायकवाड यांच्याहस्ते वृक्षारोपण करून करण्यात आले. या मैदानामध्ये १५० झाडे तर उर्वरीत ९० लाख रुपयांची झाडे शहरात लावण्यात येणार आहे. यावेळी नगरपालिकेचे मुख्याधिकारी गणेश पांडे यांच्यासह शिवसेना, युवासेनेचे पदाधिकारी शिवसैनिक, न.पा कर्मचारी मोठ्या संगणक उपस्थित होते.

# केस गळती, नख गळतीनंतर आता हाताला भेगा पडण्याचा प्रकाराने नागरिक त्रस्त

## आरोग्य विभाग अलर्ट मोडवर : शेलगाव देशमुख येथील प्रकार

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** जिल्ह्यातील नागरिकांनी चालू वर्षात अचानकपणे केस गळणे, टक्कल पडणे आणि बोटांची नखे गळून जाणे अशा गूढ आजारांचा अनुभव घेतला आहे. खामगाव व शेगाव तालुक्यांमध्ये सुरू झालेला हा आजार आता चिखली व मेहकरसारख्या घाटमाथ्याच्या भागातही पसरला आहे. या प्रकारांना अनेक महिने उलटले असतानाही भारतीय वैद्यकीय संशोधन संस्थेचा अहवाल अजुनही लालफीतशाहीत अडकलेला आहे. त्यातच आता मेहकर तालुक्यात हाताला भेगा पडण्याच्या आजाराची चर्चा सुरू झाली आहे. विशेषतः मेहकर तालुक्यातील शेलगाव देशमुख गावातील १८ गावकऱ्यांनी हाताला खोल भेगा पडत असल्याच्या तक्रारी आरोग्य विभागाकडे नोंदवल्या आहेत. हा प्रकार केंद्रीय आरोग्य आणि आयुष राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या गृह मतदारसंघातील गावात उघडकीस आल्याने आरोग्य विभागाने याची गंभीर दखल घेतली आहे. जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाचे विशेष पथक शेलगाव देशमुख येथे दाखल झाले. आरोग्य विभागाच्या विशेष पथकाने गावातील बाधित नागरिकांची सखोल वैद्यकीय तपासणी केली.





### नेमका आजार कोणता आहे?

पथकाने केलेल्या तपासणीत एकूण १८ रुग्णांची पाहणी करण्यात आली. यातील बहुतांश रुग्णांना इसबगोल (एक्झेमा, पाल्मोप्लांटर केराटोडर्मा किंवा पाल्मोप्लांटर सोरायसिस) या त्वचाविकाराचे लक्षणे आढळून आली आहेत. हे रुग्ण मागील १२ महिने ते ५ वर्षांपासून या आजाराने त्रस्त असल्याचे निदर्शनास आले आहे. या रुग्णांवर मागील १ ते २ वर्षांपासून बुलढाणा व अकोला येथील त्वचारोग तज्ज्ञांकडून उपचार सुरू असल्याचेही तपासणीतून निष्पन्न झाले आहे. हा आजार संसर्गजन्य नसून पाण्याशी याचा काहीही संबंध नाही, वेगवेगळ्या प्रतिजन किंवा हानिकारक रसायनांच्या संपर्कात आल्यास, शरीराच्या स्वयंप्रतिकारक प्रणालीद्वारे ( ) हा विकार उद्भवतो. तसेच, सर्व रुग्णांना आणि स्थानिक आरोग्य कर्मचाऱ्यांना या आजाराची माहिती, योग्य उपचार पद्धती व घ्यावयाची काळजी याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आल्याची माहिती डॉक्टरांनी दिली आहे.

### नमुन्याचा अहवाल अडकला लालफित शाहीता

दरम्यान, गेल्या डिसेंबर महिन्यापासून बुलढाणा जिल्ह्यातील शेगाव, नांदुरा, खामगाव तालुक्यातील अनेक गावात अचानक केस गळतीने नागरिक हैराण झाले होते. केस गळतीनंतर रुग्णांची नखे अचानक विद्रूप होऊन नखे कमजोर होऊ लागली होती. अनेकांची नखे गळून पडली असल्याचं धक्कादायक वास्तव समोर आलं होतं. त्यानंतर रुग्णांना प्रचंड थकवा व चिडखोरपणा जाणवू लागला होता. या सर्व प्रकारानंतर आयसीएमआरच्या पथकाने या भागाचा दौरा करून अनेक नमुनेही तपासणीसाठी घेतले होते. मात्र याबाबतचा अहवाल अजूनही लालफीतशाहीत अडकलेला आहे.